Historicity Research Journal
Volume 2 | Issue 9 | May 2016

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

Research Article

# शिवाजी महाराजांच्या सैन्यातील मुस्लिम सैनिक

**रविन्द्र मुन्द्रे**

विभाग प्रमुख, इतिहास विभाग ,
श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय, अकोला (महाराष्ट्र)

**Abstract :-**

शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करित असतांना निष्ठावान सैनिकांचे संघटन केले. जात, धर्म, पंथ यावरून सैनिकांची पदनिश्चिती होत नसे तर स्वराज्याबद्दलची निष्ठा ज्यांच्यामध्ये आहे त्यांनाच पदे बहाल केल्या जात असे. म्हणूनच अनेक मुस्लिम सैनिक शिवाजींच्या सैन्यात प्रमुख पदांवर असलेले दिसतात. ज्यामध्ये नुरखान बेग, शमाखान, इब्राहीमखान, सिद्दी इब्राहीम, काझी हैदर असे अनेक मुस्लिम लष्करी आणि प्रशासकीय विभागात होते. आपण जरी हिंदू असलो तरी आपण फक्त हिंदूचाच गोतावळा निर्माण न करता स्वराज्याच्या स्थापनेसाठी सर्वांचे सहकार्य आवश्यक आहे, ही शिवाजी महाराजांची भावना होती. शिवाजी महाराजांना व्यक्तींना पारखण्याची दृष्टी लाभली असल्यामुळे त्यांनी योग्य व्यक्तीची योग्य पदावर नेमणूक केली. म्हणूनच अतिशय कमी कार्यकाळात त्यांना मराठा साम्राज्याची निर्मिती करता आली.

**Keywords :-** नूरखान बेग, शमाखान, शिवाजीचे मुस्लिम सरदार.

**प्रस्तावना :-**

शिवाजी महाराजांनी आपल्या सैन्यातील प्रत्येक विभागात मुस्लिमांना स्थान दिले होते. साध्या सैनिकांपासून तर प्रमुखापर्यंत मुस्लिमांना पदे देण्यात आली होती. महाराज आपल्या पारखण्याच्यादृष्टीने त्याला तपासून घेऊन आणि त्याचा पराक्रम पाहून नियुक्ती करीत होते. तो विशिष्ट जातीचा, धर्माचा किंवा नातेवाईक आहे म्हणून त्याला पद देण्यात येत नव्हते. तर तो किती प्रामाणिक आहे, स्वराज्याच्या उद्दिष्टांशी तो किती एकरूप झाला आहे, स्वराज्याची भावना त्याच्या मनात किती भरली आहे याचा शिवाजी महाराज सतत प्रत्येकात शोध घेत राहिल्याने, माणसे तपासूनच ते घेत असल्याचे दिसून येते, त्यामुळे तो कोण? कुठल्या जातीचा? धर्माचा? अथवा पूर्वी चाकर कुणाचा? इत्यादी प्रश्नांना आपोआपच बगल मिळत गेली. स्वराज्यासाठी जो जो प्रामाणिकपणे लढेल, स्वराज्याला आपल्या निष्ठा वाहील, तो आपला हे समीकरणच महाराजांनी तयार केले होते.

आपला पराक्रम पाहून आपल्याला पद मिळेल म्हणजेच आपल्या पराक्रमाची किंमत शिवाजी महाराज करीत आहे. तर मग फक्त पैश्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य आणि पराक्रम खर्ची का घालावा? आणि जो उच्च ध्येय ठेऊन लोककल्याणासाठी राज्याची निर्मिती करण्याच्या प्रयत्नात आहे, त्यांच्याविरूद्ध तलवार चालविण्यापेक्षा त्याच्याच सैन्यात नौकरी करून स्वराज्याच्या निर्मितीत आपला पराक्रम व जीवन घालवून आपला पृथ्वीवरील जन्म सार्थकी लावावा ही भावना इतर शासकांच्या सैन्यातील मनात निर्माण होत होती. तेव्हा आपल्या अन्यायी धन्याची अन्न-धान्यासाठीची चाकरी सोडून पराक्रम गाजविण्यासाठी हिंदू, मुस्लिम सैनिक शिवाजी महाराजांच्या सेवेत हजर होत होते. शिवाजी महाराज सुद्धा त्यांना आपल्या कार्यात मोठ्या आनंदाने सहभागी करून घेत होते. त्यांची योग्यता पाहून त्यांच्यावर कामगिरी सोपविली जात होती.

शिवाजी महाराजांच्या सैन्यात मुस्लिम सैनिकांचा भरणा सुद्धा मोठ्या प्रमाणात होता. सैन्यातील मोठमोठ्या पदावर मुस्लिम सैनिक कार्य करीत होते. त्यात सरनोबत नुरखान बेग, घोडदळातील सरदार शमाखान, तोफखाना प्रमुख इब्राहीम खान, अंगरक्षक सिद्दी इब्राहीम, वकील काझी हैदर असे अनेक लष्करी आणि प्रशासकीय विभागात मुस्लिम होते. शिवाजी महाराज जरी हिंदू असले तरी मात्र त्यांच्या मनात इतर धर्माबद्दल द्वेष नव्हता. मुसलमानांचा द्वेष करून आपण श्रेष्ठ हिंदू बनू अशी मुर्खपणाची त्यांची भावना नव्हती. मध्ययुगात देखील त्यांची धर्मसाधना डोळस होती. म्हणूनच त्यांनी मुस्लिमांना आपल्या सैन्यात महत्त्वाच्या जागा दिल्या होत्या. आपल्या अंगरक्षकामध्ये सुद्धा मुस्लिमांना त्यांनी स्थान दिले होते. म्हणजेच महाराजांचा आपल्या मुस्लिम सैनिकांवर पूर्ण विश्वास होता. या विश्वासाच्या आधारावर आणि मुस्लिमांच्या पराक्रमानेच शिवाजी महाराजांना आपल्या निधर्मी राज्याची संकल्पना साकार करता आली.

**सरनोबत - नूरखान बेग :**

शिवाजी महाराजांच्या लष्करी व्यवस्थेमध्ये सरनोबत हे पद फार महत्त्वाचे आणि प्रतिष्ठेचे समजले जात होते. या पदावर एक मुस्लिम कार्य करीत होता. सरनोबत हे पद किती महत्त्वाचे होते हे पुढील तक्त्यावरून दिसून येते.

| | | | |
|---|---|---|---|
| "१ | घोड्यास - | १ | बारगीर |
| २५ | बारगीरास - | १ | धारकरी हवालदार |
| ५ | हवालदारास - | १ | जुमला |
| १० | जुमल्यास - | १ | हजारी |
| ५ | हजारियास - | १ | पंचहजारी |

पंचहजारी सरनोबतच्या हुकुमात, शिलेदाराकडे सुभे वेगळाले, तेही सरनोबतच्या आज्ञेत, पागा व शिलेदार सरनोबताच्या आज्ञेत वर्तावे."[१] यावरून सहचज दिसून येते की, संपूर्ण लष्कराचे सर्वोच्च अधिकाराचे स्थान हे सरनोबताचे आहे. स्वराज्याचे अतिशय महत्त्वाचे असलेले सरनोबताचे हे स्थान एका मुसलमानाकडे शिवाजी महाराजांनी दिले होते.

"पुणे येथे झालेला प्रसिद्ध महजर
महजर कसबे पुणे, ता. २१ मार्च १६५७

**हजर इसम :** रा. शिवाजी राजे साहेब, काजी अब्दुल बिन काझी, महमूद हकितशहा व काजी नयाब
**महशल हजरत :** रा. सामराज निळकंठ पेशवे, वासुदेव बाळकृष्ण मुजुमदार, सोनाजी, विश्वनाथ दबीर, महादजी सामराज सुरनीस, बालाजी नाईकपुंडे मजालसी, बाबाजी हरी मजालसी, नानकोजी दहातोंडे सरनोबत, रघुनाथ नारायण सरसबनिस, नूरबेग सरनोबत पाहुलोक रा. शामराव परमनाभी सबनिस, पाऊलोक आबाजी महादेव हेजीब."[२]

यावरून सरनोबत हा एक मुस्लिम होता हे स्पष्ट होते. "नूरखान बेग हा १६५७ ला मराठ्यांचा सरनोबत होता."[३]

शिवाजी महाराजांनी घोडदळातील महत्त्वाचे सरनोबत हे पद मुस्लिमांकडे देऊन आपल्या राज्यातील धर्माची संकल्पना स्पष्ट केली होती. १६५७ मध्ये मुस्लिम सरनोबत पदापर्यंत पोहचतो? म्हणजे स्वराज्य निर्मितीच्या प्रक्रियेपासून शिवाजी महाराजांनी मुसलमानांना आपल्या सैन्यात स्थान दिले होते. इतकेच नव्हे तर "शिवाजी महाराजांच्या घोडदळात एक लक्ष पाच हजार घोडेस्वार होते, त्यापैकी साठ हजार घोडेस्वार मुस्लिम होते, हे सत्य जॉन फ्रायर आपल्या टिपणीत सांगतात."[४]

"हिंदवी स्वराज्यात घोडेस्वारात मुस्लिमांना अधिक प्राधान्य मिळत होते आणि हे घोडेस्वार आपल्या धर्मापेक्षा अन्नदात्या धन्यावरच आपली निष्ठा राखून नोकरी बजावत असत."[५] म्हणजे शिवाजी महाराजांवर निष्ठा ठेऊन मुस्लिम घोडेस्वार आपले कार्य करीत होते. त्यांना धर्माचे काहीही वाटत नव्हते कारण त्यांच्या धार्मिक भावनांची जोपासना स्वराज्यात होत होती. धर्म स्वातंत्र्यांचा अधिकार महाराजांनी सर्वांना दिला होता. आपला अन्नदाता शिवाजी वाचला तर आपले अधिकार, हक्क टिकून राहतील म्हणून शिवाजीला वाचविणे महत्त्वाचे आहे. कारण आपल्या सर्वांचे नेतृत्व तो करतो आहे. नेतृत्वच जर नाहीसं झाल तर राज्य बुडण्यास वेळ लागणार नाही म्हणूनच आपल्या जीवाची पर्वा न करता हे मुस्लिम सैनिक शिवाजीला वाचवित होते. अशा प्रामाणिक आणि निष्ठावान सैनिकांचा भरणा मराठा सैन्यात असल्यामुळेच स्वराज्य निर्मितीस गती निर्माण झाली होती.

**घोडदळातील सरदार - शमाखान :**

महाराजांच्या घोडदळात अनेक कर्तबगार मुस्लिम सरदार होते. त्यांनी स्वराज्यासाठी आपल्या प्राणाची बाजी लावली, अशाच एका सरदाराचा उल्लेख सभासद बखरीत येतो, त्याचे नाव शमाखान. "महाराजांच्या सरदाराची जी यादी सभासदाने दिली आहे, त्यात हंबीरराव मोहीते, नेताजी पालकर, धनाजी जाधव, परसोजी भोसले, संताजी घोरपडे यांच्या बरोबर शमाखान याचेही नाव येते. याचबरोबर श्री शेजवलकरांनी जी शिवरायांच्या मुस्लिम चाकराची यादी दिली आहे, त्यात क्रमांक सातवर शमाखानचे नांव आहे."[६]

"तानाजी मालसुरे कोंढाणा किल्ला घेतांना शहीद झाला. तरीपण त्यांच्या सैनिकांनी कोंढाणा सर केला. या विजयामुळे मराठा सैनिकांचा उत्साह द्विगुणीत झाला. शिवाजी महाराजांच्या आदेशाप्रमाणे त्यांनी मोगली हद्दीतील ठाणी, गड जिंकण्यास सुरूवात केली. प्रतापराव, हंसाजी, येसाजी, आनंदराव सर्जेराव, निळोपंत रूपाजी, शमाखान, इब्राहीमखान असे कितीतरी सरदार आपापल्या फौजा घेऊन मोगली मुलुखात शिरले. विसापूर, वज्रगड, राजमाची, जुन्नर, भिवंडी, कल्याण, चाकण, इंदापूर अशी अनेक ठाणी त्यांनी जिंकली. पुरंदर, लोहगड, हिंदोळा, कर्नाळा, माहुली, रोहिडा इत्यादी किल्लेही त्यांनी हस्तगत केले."[७]

शिवाजी महाराजांच्या घोडदळातील सरदार शमाखान हा हंबीरराव मोहीते, नेताजी पालकर यांच्या तोडीचा होता. कर्तबगार शमाखान स्वराज्यासाठी आपला जीव तळहातावर ठेऊन लढला होता. कोंढाणा घेतांना तानाजी मालसुरे शहीद झाल्यानंतर शिवाजीच्या सैनिकांनी तानाजीच्या मृत्युचा बदला मोगलांची अनेक ठाणी जिंकून घेतला, त्यात शमाखान सुद्धा होता. तानाजी मालसुरे हा हिंदू असताना आपण त्याच्या मृत्यूच्या बदल्याच्या भावनेत सहभागी न होता वेगळे राहीले पाहिजे, ही भावना सुद्धा शमाखानाच्या मनात निर्माण झाली नाही. तानाजीच्या मृत्यूने तो इतका पेटून उठला होता की, मोगलांना भराभर किल्ले खाली करून मराठ्यांच्या हातात सोपवावे लागले. तो जरी मुस्लिम होता तरी सैनिकात जो बंधुभाव शिवाजी महाराजांनी निर्माण केला होता, तो अशा नाजूक प्रसंगी कामी येत

होता. याच बंधुभावाच्या आधारावर तानाजीचा मृत्यू म्हणजे आपल्या भावाचा मृत्यू म्हणून प्रत्येक सैनिक पेटून उठला होता. मग तो शमाखान असो, इब्राहीमखान, प्रतापराव असो सर्व सारख्याच भावनेने प्रेरित होऊन शत्रूशी लढतांना दिसत होते. त्यांना मरणाऱ्याची जात किंवा धर्म आठवत नव्हता तर त्याने केलेली स्वराज्याची सेवा, त्याने केलेले शिवाजीसाठी धाडस, हे आठवत होते. मग आपणही स्वराज्य आणि शिवाजीसाठी असच करायला पाहिजे. स्वराज्याची सेवा करता करता मृत्यू जरी आला तरी तो हसत हसत स्वीकारला पाहिजे. असे प्रत्येक सैनिकाला वाटत होते. कारण शिवाजी महाराजांनी त्यांच्यात निर्माण केलेली स्वराज्यनिष्ठा त्यांना हे सर्व करण्यासाठी प्रोत्साहित करीत होती.

**तोफखाना प्रमुख - इब्राहीमखान :**

"शिवाजी महाराजाच्या तोफखान्याचा प्रमुख एक मुसलमान होता. त्याचे नाव इब्राहीमखान. तोफखाना म्हणजे लष्कराचे एक प्रमुख अंग कदाचित सर्वात महत्त्वाचे. तोफा हे त्या काळचे सर्वात प्रगत हत्यार, किल्ल्यांच्या लढाईत त्याचे महत्त्व फार मोठे. अशा महत्त्वाच्या तोफखान्याचा प्रमुख एक मुसलमान होता."[८] शिवाजी महाराजांची माणसे पारखण्याची दृष्टी प्रत्येक बाबतीत यशस्वी ठरली होती. इब्राहीमखानाच्या बाबतीत सुद्धा हेच दिसून येते. योग्यतेनुसार त्याच्यावर कामाची जबाबदारी सोपविणे हा गुण सुद्धा महाराजांमध्ये उत्कृष्टच होता. म्हणूनच सैनिकांकडून जे काम होते तेच त्याच्यावर सोपविले.

डोंगरी किल्ल्याच्या लढाईत तोफखान्याला अतिशय महत्त्वाचे स्थान असे. तोफखाना म्हणजे विजयाची हमखास खात्री. तोफखान्यामुळेच अनेक अजिंक्य किल्ले सर करता आले. तोफखान्यासाठी लागणाऱ्या छोट्या तोफा फ्रेंच व डच यांच्या जहाजांवरून महाराजांना गुप्तरितीने मिळत असत. शत्रूवर विजय मिळाल्यावर त्याच्या तोफा आणि दारूगोळाही ताब्यात येई. अशा २०० तोफा लढाईकरिता सज्ज असत. बाकीच्या तोफा किल्ल्यावर ठेवल्या जात. पायदळाबरोबर तोफा गाड्यावर चढवून नेण्यात येत. "तोफा डागणारे गोलंदाज हे मुस्लिम असत."[९] म्हणजे तोफखान्यामध्ये सुद्धा मुस्लिमांचा भरणा जास्त होता. प्रमुख गोलंदाज हे मुस्लिम रहात होते, यावरून एकंदरित महाराजांच्या प्रत्येक दळात मुस्लिमांची संख्या मोठ्या प्रमाणात होती. महत्त्वाची पदे आणि धाडसी कार्य हे मुस्लिमांकडे सोपविले जात होते. जसे गोलंदाजी करणे, आरमारात राहून सागरावर वर्चस्व निर्माण करणे, घोडदळात राहून शत्रूसैन्याला नामोहरम करणे, अंगरक्षक राहून शिवाजी महाराजांचे रक्षण करणे असे कितीतरी धाडसी आणि शौर्यशाली कार्यासाठी महाराजांनी मुस्लिमांना नेमले होते.

**अंगरक्षक - सिद्दी इब्राहिम :**

शिवाजी महाराजांच्या लष्करी शासन व्यवस्थेमध्ये राजाचे शरीर संरक्षक दल हा एक विभाग होता. लष्करामध्ये जे अतिशूर, लढवय्ये, एकनिष्ठ आणि हुशार सैनिक असत त्यांना महाराजांच्या शरीर संरक्षक दलात घेतले जाई. खास महाराजांनी त्यांचा कस पाहिलेला असे व हे सैनिक खास विश्वासातील असत. राजमहालाच्या द्वारी, निवासस्थानी या दलातील सैनिकांची नेमणूक होत असे. राजा मोहीमेवर असता, त्यांच्या अवती-भवती ते राजाचे संरक्षण करत असत. या दलामध्ये अत्यंत कठोर शिस्त पाळली जात असे. थोडीही कसूर झाल्यास त्यास कठोर शिक्षा केली जाई.

शिवाजी महाराजांनी आपले शरीर संरक्षण दल कसे तयार केले होते हे पुढील माहितीवरून कळण्यास सोपे होते. "रजियांनी आपल्या पालखीबरोबर चखोट माणूस पाहून निवडक आसामी ठेवले. चहू पातशहाचे दावेदार, एखादे वेळेस प्रसंग पडतो, तेव्हा जे जवळ आहेत ते कार्यास येतील असे जाणून मावळे लोकांत पहाणी करूनी निवडक माणस पाहून पतके केली. मावळ्या-मावळ्यामध्ये लोक उत्तम निवडला. निवडक भरती करून चार पतके मिळून दोन हजार माणूस ठेवीले. त्यात काही बंदुखी, काही विटेकरी, वरकड आडहत्यारी, फिरंगवाले असे माणूस सजले. तितके माणसास साज करून दिले. डोईस मंदिल, दोन्ही हाती दोन सोन्याची कडी, कोणास रूप्याची कडी, बंदुकीस कट रूप्याचे कानास जोडी कुटक्याची येणे प्रमाणे... लोक सजविले."[१०] अशाप्रकारे शिवाजी महाराजांनी अतिशय हुशारीपूर्वक आपले संरक्षक दल निर्माण केले होते. या शरीर संरक्षक दलाने शिवाजी महाराजांचे रक्षण प्रत्येक मोहीमेच्या वेळी केले. अफजलखान प्रकरणात जिऊ महाले याने केलेला पराक्रम इतिहासात अजरामर आहे. त्याचप्रमाणे इ.स. १६६४ सालच्या सुरतेच्या पहिल्या लुटीच्या वेळी सुरतेचा सुभेदार इनायतखान याने महाराजांवर मारेकरी पाठविला होता. हा मारेकरी वाटाघाटी करण्याचे ढोंग करून महाराजांवर तलवार उपसून अचानक धावला. तेव्हा महाराजांच्याजवळ उभा असलेल्या शरीर संरक्षकाने डोळ्यास पाते लवते न लवते तोच त्या मारेकऱ्याचा हात वरचेवर उडविला व राजाचा जीव वाचविला. या प्रसंगी शरीर रक्षकाने एखाद्या क्षणाचा जरी विलंब केला असता तर मराठ्यांचा इतिहास बदलून गेला असता. महाराजांचे संरक्षक दल किती तल्लख आणि समयसूचकता बाळगून राहात होते हे या घटनेवरून दिसून येते.

शिवाजी महाराजांच्या अंगरक्षकात मुस्लिम सुद्धा होते. सिद्दी इब्राहिम हा महाराजांचा अंगरक्षक होता. अफजलखानाचा वध आणि फोंडा किल्ल्याची लढाई या दोन घटना सिद्दी इब्राहिमच्या जीवनातील महत्त्वाच्या घटना आहेत. अफजलखानाच्या रूपाने स्वराज्यावर भयानक संकट कोसळले, परंतु महाराज सावध होते. त्यांचा आपल्या सामर्थ्यावर आणि सहकाऱ्यांच्या पराक्रमावर विश्वास होता, त्यामुळे न डगमगता त्यांनी खानास टक्कर देण्याचे ठरविले. भेटीच्या दिवशी ठरलेल्या ठिकाणी दोघांनीही आपल्या दहा अंगरक्षकासह यावे. याशिवाय एक वकील सोबत असावा. या व्यतिरिक्त अन्य व्यक्तींना प्रवेश नाही. अंगरक्षक शामियानाच्या बाहेरच थांबतील, असेही ठरले. त्याप्रमाणे महाराजांनी आपल्या दहा अंगरक्षकांची निवड केली. माणसांची पारख असलेल्या महाराजांना अंगरक्षकांची निवड करायला फारसा वेळ लागला नाही. भेटीच्या दिवशी महाराज खानाच्या भेटीला निघाले. सोबत वकील म्हणून पंतोजी गोपीनाथ बोकील हे होते. महाराजांच्या

दहा अंगरक्षकांची नावे पुढीलप्रमाणे - "१. संभाजी कावजी, २. कांताजी इंगळे, ३. कोंडाजी कंक, ४. येसाजी कंक, ५. कृष्णाजी गायकवाड, ६. सुरजी काटके, ७. इब्राहिम सिद्दी, ८. जीवा महाला, ९. विसाजी मुरूंबक, १०. संभाजी करवर."[११]

शिवाजी महाराजांनी इब्राहिम सिद्दीची आपला अंगरक्षक म्हणून नियुक्ती केली होती. या प्रसंगी झालेल्या हाणामारीचे वर्णन असे, "...तेव्हा संभाजी कावजी, कांताजी इंगळे, कोंडाजी कंक, येसाजी कंक, कृष्णाजी गायकवाड, सुरजी काटके त्याचप्रमाणे जीवा महाला, विसाजी मुरूंबक व इब्राहिम सिद्दी (बर्बर) अशा शिवराजरक्षक दहा महाविरांनी गर्जना करून म्यानातून प्रचंड तलवारी उपसून पर्वतांनी जसे वायूस अडवावे तसे त्याने योध्यास विरोध केला. कावजी, दोघे कंक, अभिमानी इंगळे, शूर मुर्बिक त्याचप्रमाणे करवर, क्रुर काटके, गायकवाड आणि सिद्दी (बर्बर) यांनी आवेशाने दुसऱ्याही शत्रूंना पटापट पाडले."[१२]

"अफजलखानाचा पुतण्या रहिमतखान, पिलाजी व शंकर मोहिते शिवाजीवर तलवारी उगारून धावून गेले, पण येसाजी आणि इब्राहिम सिद्दी या दोघांनी त्यांना अडविले. त्यांच्यातच हातघाईची लढाई होऊन रहिमतखान, पिलाजी मोहिते व शंकर मोहिते ठार झाले."[१३] सिद्दी इब्राहिमने अफजलखान प्रकरणात दाखविलेला पराक्रम त्याच्याच शौर्यशाली स्वभावाला शोभण्यासारखाच होता. शिवाजी महाराज ज्या गुणांवर शरीर संरक्षक दलात सैन्याला भरती करीत होते आणि त्यातून दहा जणांची निवड ही अतिशय बारीक कसोट्या लावून केला होती. सिद्दी इब्राहिमची केलेली निवड योग्यच होती हे त्याने आपल्या पराक्रमाने दाखवून दिले. या दहा जणांत तोच एक फक्त मुसलमान होता. आणि तो ज्यांच्यासोबत लढायला चालला होता ते सुद्धा मुस्लिम होते. परंतु धर्माचा लवलेशही त्याच्या आड आला नाही. अफजलखानाचा पुतण्या रहीमतखानाला ठार करून आपण शिवाजी महाराजांचे निष्ठावंत सेवक आहे हे दाखवून दिले.

फोंड्यांचा किल्ल्याची लढाई ही सिद्दी इब्राहिमच्या जीवनातील आणखी एक रोमहर्षक घटना आहे. या लढाईत सिद्दीच्या पराक्रमाचा कळस केला, की ज्यामुळे त्याला फोंड्याची किल्लेदारी शिवाजी महाराजाने बहाल केली. "फोंडाकोटा आदिलशाहीत होता. राजीयाकडील सरदार इब्रामखान मुसलमान मोठा धारकरी लष्कराच्या हजारीबरोबर होता. त्याने कष्ट बहुत केले. ते जागा सुरूंग लावून हुडे बुरूज उडविले. फोंड घेतले. फोंडकोट येथे इदलशाही मोहबतखान राजबिंडा सरदार जबरदस्त होता. ते जागा वेढा घालून सुरूंग लावून बुरूज उडवून फोंड घेतले मोहबतखान कौल देऊन विजापूरास जावयास निरोप दिला. तेव्हा राजीया सरदार इब्रामखान मोठा मुसलमान धारकरी लष्कराच्या कंजारीबरोबर होता. त्याने कष्ठ मेहनत बहुत केली..."[१४] यावरून तीन बाबी स्पष्ट होतात की, इब्राहिमखान हा लष्करातील अधिकारी असून तो हजारी या लष्करातील महत्त्वाच्या पदावर होता. दुसरी बाब म्हणजे जो शिवाजीबरोबर फोंड्याच्या लढाईत होता आणि तिसरी म्हणजे त्याने या लढाईत मोठा पराक्रम केला.

"...सावंतवाडीकरांच्या सैन्याचा पराभव झाल्यामुळे ते फिरंग्याच्या मुलखात निघून गेले. शिवाजी महाराजांनी ताबडतोब फोंड्याच्या किल्ल्यास वेढा दिला. या किल्ल्यात सावंतवाडीकरांचे निवडक सैन्य होते. त्यांनी शर्थीने किल्ला लढविला. शिवाजीचे सैनिकही जीवावर उदार होऊन लढत होते. विशेषतः इब्राहिमखान या निधड्या व शूर सेनानीने पराक्रमाची शर्थ केली. शिवाजीचे निशाण घेऊन तो बेधडक किल्ल्यात शिरला. किल्ला सर करू निशान फडकविले. त्याला शिवाजीने शाबासकी दिली व किल्ल्याची किल्लेदारी देऊन त्याचा गौरव केला. अफजलखानाच्या वधात त्याची कामगिरी पाहून त्यास मानाची जागा दिली."[१५]

फोंड्याच्या लढाईच्या संदर्भात राजापूरहून मुंबईला लिहिलेले पोर्तुगीजांचे एक पत्र आले. २० एप्रिल १६८५ हे पत्र पाठविले होते. त्यात फोंड्यासाठी शिवाजी महाराजांनी किती चिकाटीचे प्रयत्न केले, हे दिसून येते. "शिवाजी सर्व सैन्य घेऊन फोंड्याशी चंग बांधून बसला आहे. पुष्कळ प्राणहानी झाली. त्याने चारदा सुरूंग लाविले, गोव्यातील पोर्तुगीज त्याला भितात, कारण फोंडा घेतल्यावर तो गोवा घेईल... पोर्तुगीज फोंड्याला शक्य ती मदत करतात. एकदा अन्नसामुग्रीने भीलेली फोंड्याकडे येणारी पोर्तुगीजांची १० शिबाडे शिवाजीला सापडली. उघडपणे विचारल्यावर मात्र व्हॉईसरॉय नाकबूल झाला."[१६]

अफजलखान प्रकरणात अंगरक्षक असलेला सिद्दी इब्राहिम फोंड्याच्या पराक्रमाने किल्लेदार झाला. शिवाजी महाराजांनी त्याच्या पराक्रमाची वाहवाह करून त्याची पाठ थोपटली. शिवाजी महाराजांनी पराक्रमाला आणि शौर्याला अग्रक्रम दिला असल्यामुळे स्वराज्यातील एक मुसलमान सैनिक किल्ल्याचा किल्लेदार बनला. जातीयतेचा अंश जर महाराजांमध्ये असता तर असे घडले नसते. महाराजांनी मुस्लिमांना आपल्या सेवेत ठेऊन त्यांच्या पराक्रमाने आपल्या स्वराज्याची निर्मिती केली.

**शिवाजी महाराज आणि मदारी मेहतर :**

शिवाजी महाराजांच्या व्यक्तिगत सेवकांमध्ये मदारी मेहतराचे स्थान महत्त्वाचे आहे. हा मुस्लिम असून सुद्धा महाराजांवर आपला जीव ओवाळून टाकीत होता. आग्राच्या कैदेत महाराज असताना हिरोजी फर्जत सोबत महत्त्वाची कामगिरी मदारी मेहतराने बजावली होती. आग्राच्या सुटकेची सविस्तर हकीकत पाहील्यानंतर त्याच्या स्वामीनिष्ठेबद्दलची कल्पना येते.

"... महाराज आग्रा गेले...पातशहानी? बहुत सन्मान केला...तो एक दिवस विसर पडून...महाराज अटकेत ठेवले, तेव्हा महाराजांवर संकट पडले. उपाय दिसेनासा झाला. चिंताग्रस्त झाले. ते समयी हिरोजी फर्जद जवळ होता. त्यास महाराजांनी उपाय सांगितला की, मिठाईच्या डाल्या तयार करणे. म्हणून महाराजांनी आपल्या सेवकास सांगितले की, डाल्या तयार करण्याबद्दल बादशहाचा हुकूम घेणे. तेव्हा दरोगा पातशहास जाऊन हुकूम मागितला. त्यास पातशहाने दरोग्यास विचारले की, शिवाजी राजे मिठाई कशाची वाटतात, तेव्हा दरोगा म्हणू लागला की, पूर्वीपासून आमचे व्रत चालविले आहे. आज अटकेत आहो म्हणून आपण नेम न करावा यैसा अर्थ नाही. साहेबी हुकूम दिलात, लोक चालवू नाही तर न करू यैसे म्हणताच पातशहाने हुकूम दिला आणि डाल्याच्या मोईनी केल्या, पहिली डाली पाछायास पाठविली, दुसरी डाली उदेपूरच्या राजास पाठविली, तिसरी डाली जयनगरच्या राज्यास पाठविली. यैसे नेमणूकीप्रमाणे चारी राजे, उमराव, मुत्सद्दी यांसी डाल्या (सहा) महिने पावतो पाठविल्या, सुदामत चालीले. मागती चक्कीदारास सांगितले की, डाल्यांच्या झडा कशास घेता म्हणून, राबता मोडला, ते समयी हिरोजी फर्जद बोलविला आणि दरोग्यास इतबार देऊन राबता पाडली. तेव्हा

हिरोजीस महाराजांनी बोलाविले आणि विचारले की, ये समयी संकट पडले आहे तर माझे जीवचे साथी कोण आहेत? तेव्हा हिरोजी फर्जत बोलीला की, साहेब ज्या समयी आज्ञा करतील ते समयी हिरोजी फर्जद व मदारी मेहतरफरास हजर होऊ. हुकूम करावे, यैसे म्हणताच हिरोजी फर्जदास आपला अंगचा पोषाख दिला तेव्हा सर्व गोष्टीचा प्रकार महाराजांनी निरखून सांगितला. जे आमचे स्वरूप तेणे प्रमाणे तुम्ही रूप पालटून आमचे पलंगावर निजणे व मदारी मेहतरास सांगितले की हा मसुदा ती सिवाय फुट न देणे. यैसे बोलून दोघापासून महाराजांनी क्रिया घेतली. इनाम जाले इनाम जालीयावरी मिठाईच्या डाल्या काढल्या. काढल्यावर राजीयास डालीमध्ये बैसविले, सरपोशेवर टाकीला, तमाम डाल्या निघाल्या. महाराज काशीस गेले. तेथून आपले देशास आले. वर मागे पुकार जाली. पातशहा दरोग्यास पुसू लागला की, महाराज काय करितात. तेव्हा मदारी मेहतर बोलीला की, राजयाच्या जीवास समाधान वाटत नाही. यैसे म्हणतास पातशहाने थोर थोर उमराव महाराजांच्या समाचारास पाठविले. ते पलंगाजवळ आले तो अशास हात ठेऊन निद्रा केली. तो उमरावानी हात पाहताच परीक्षा केली. तो राजा नव्हे तेव्हा पदर तोंडावरला काढला. तो हिरोजी निजला होता. त्यास पुसू लागले की, राजा काय जाला? तेव्हा हिरोजीस पाछाजवळ नेले. पाछाय पुसू लागले की, महाराज काय जहाले? तेव्हा हिरोजी म्हणो लागला की, सहा महिने ते जाले, महाराज आपल्या देशात गेले. ते समयी पातशहा क्रोधामान होऊन बोलीला की, हिरोजीची गर्दन मारा, म्हणून इतराज आले. हजरतांनी सुखरूप शिरच्छेद करावा. हा जीव महाराजांवरून सदका केला. ऐसा म्हणताच पातशा मेहरबान जाला आणि म्हणो लागे की, इमानी चाकर हलाल आहेस, मेहरबान जालो. काय मागतोस ते मागण. तेव्हा हिरोजीने मागीतले की, मदारी मेहतर व मजला यैसा दोघास जीव माफ करून आज्ञा द्यावी. तेव्हा पातशहानी सिरपाव देऊन सर्वत्रास निरोप दिला. तेव्हा समस्त निघोन रायगडास आले. महारजास मुजरे केले. ते समर्द महाराज मेहरबान झाले. सिरपाव देऊन हिरोजीस अवघे किल्ल्याच्या इमारतीचा हवाला दिला व मदारी यास पोषाख व सोन्याची कडेसुद्धा इनाम दिले. ते समयी तख्याची पुजा भरजरी बादली, चादर व मोहरा पांच व ताडपत्री पडोसी? यैसे कानू करून मेहरबान होवून बकसिस केले..."[१७]

औरंगजेब बादशहाला खरी परिस्थिती कळल्यानंतर आपला जीव नक्की जाईल, तो आपल्याला ठार मारील याची पूर्ण कल्पना असताना मदारी मेहतर थांबला होता. त्याला आपला जीव जाईल याची यत्कींचीतही पर्वा नव्हती. महाराज बादशहाच्या कैदेतून सुटून मायदेशी परत गेले पाहिजे. कारण शिवाजी महाराजांचे जिवंत राहणे आपल्यापेक्षा कितीतरी पटीने स्वराज्यास फायदेशीर आहे. महाराजांच्या जीवासमोर आपण काहीच नाही. अशा स्वामीनिष्ठ सैनिकांची भरती महाराजांनी आपल्या सैन्यात केली होती. म्हणूनच अनेक वेळा आपला जीव धोक्यात घालून किंवा आपला जीव देवून शिवाजी महाराजांचे प्राण वाचविले होते.

शिवाजी महाराजांनी हिंदू-मुस्लिमांना समान वागणूक दिली होती. त्यांच्यासमोर दोन्ही धर्माचे सैनिक सारख्याच प्रतीचे ठरत होते. त्याचप्रमाणे समानतेची भावना त्यांनी आपल्या सैनिकात सुद्धा रूजविली होती. म्हणून औरंगजेबाला हिरोजी फजर्दने मदारी मेहतराला सुद्धा सोडून द्यावे अशी विनंती केली. बंधुत्वाची भावना शिवाजी महाराजांनी जर निर्माण केली नसती तर हिरोजी फर्जद कडून अशी कृती घडू शकली नसती. मुसलमान आपल्या राज्याचे घटक आहे, स्वराज्य निर्मितीत त्यांना सामावून घेणे आवश्यक आहे, म्हणूनच मदारी मेहतरासारखे मुसलमान महाराजांच्या खाजगी सेवकात होते. मदारी मेहतरासारखे निष्ठावान मुसलमान सेवक शिवाजी महाराजांच्या सेवेत असल्यावर स्वराज्याचा पाया मजबूत बनला आणि त्यावर शिवाजी महाराज आपले सुराज्य निर्माण करू शकले.

**वकील - काझी हैदर :**

शिवाजी महाराजांनी आपल्या सैन्यातच नव्हे तर मुलकी कार्यात सुद्धा मुस्लिमांना स्थान दिलेले होते. काझी हैदर हा शिवाजी महाराजांचा वकील होता. काझी हैदर हा फारसी भाषेचा पंडित होता, तसेच तो नामवंत ग्रंथकार होता. शिवाजी महाराजांनी त्यास आपल्या खास सचिवपदी नेमले होते. महाराजांचा गुप्त पत्रव्यवहार काझी हैदर बघायचा. महत्त्वाच्या कामी महाराज त्याच्याशी सल्लामसलत करीत. कठीण पेच प्रसंगाच्या वेळी महाराज त्यास आपला वकील म्हणून पाठवित असत. "सालेरीच्या लढाईनंतर औरंगजेबाच्या दक्षिणेतील अधिकाऱ्यांनी शिवाजीशी सख्य जोडावे म्हणून एक हिंदू ब्राह्मण वकीला पाठविला. तेव्हा शिवाजीने उलट काझी हैदर यास मोगलांकडे पाठविले."[१८]

"महाराजांच्या पदरी काझी हैदर नावाचा एक मुसलमान पंडित अधिकारी होता."[१९] शेजवलकरांनी शिवरायांच्या चाकराची जी यादी दिली आहे, त्यात ५ व्या क्रमांकावर काझी हैदर वकील असा उल्लेख आहे. म्हणजे मुस्लिम वकीलाला आपल्या पदरी ठेऊन त्याचा सल्ला महाराज राज्यकारभारासाठी घेत असत. आपल्या शत्रूसोबत विचारविनीमय करण्यासाठी महाराज काझी हैदरला पाठवित होते. औरंगजेबासारखा शत्रू मुसलमान असून तो जेव्हा शिवाजी महाराजांशी सख्य करण्यासाठी ब्राह्मण वकीलाला पाठवितो. परंतु महाराज काझ ी हैदरला पाठवून आपली बाजू सक्षम बनवितात. शिवाजी महाराजांच्या मनात हा विचार सुद्धा आला नाही की, ज्याच्याशी सल्लामसलत करण्यासाठी आपण काझी हैदरला पाठवित आहो ते मुस्लिम सत्ताधिश आहे आणि काझी हैदर सुद्धा मुसलमान आहे. कदाचित काझी हैदर आपला पक्ष सोडून इस्लाम धर्माच्या नावाखाली त्यांच्यात सामील होईल. परंतु शिवाजी महाराजांनी निर्माण केलेली स्वराज्य निष्ठा ही धर्मापेक्षाही सरस ठरते आणि काझी हैदर आपले कार्य प्रामाणिकपणे पार पाडतो.

आबाजी सोनदेव हा हिंदू सरदार काझी हैदरचा होणारा आदर व मान पाहून मनात चरफरडायचा. महाराजांनी मुसलमानांना इतके लाडावून ठेवू नये, असे त्याला वाटे, ते केव्हा धोका देईल याचा काय भरवसा? असे वाटून महाराजांना त्याने एके दिवशी बोलून दाखविले. महाराजांना त्यांच्या किडलेल्या बुद्धिची किव आली ते म्हणाले, "आबाजी, इमानदारी ही काही जातीवरून ठरत नाही, तर ती ठरते कर्तव्यावरून."[२०] म्हणजेच एखादी व्यक्ती एखाद्या जातीत जन्मली म्हणजेच काही इमानदार अथवा बेईमान ठरत नाही, तर इमानदारी ही त्याने दाखविलेल्या निष्ठेवर, केलेल्या कर्तव्यावर ठरते.

**निष्कर्ष :-**

शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या निर्मितीसाठी आणि त्याचे सुराज्यात रूपांतर करण्यासाठी मुसलमानांना आपल्या सेवेत ठेवले होते. त्यांच्यात निष्ठा आणि प्रामाणिकपणा या दोन गुणांची रूजवणूक महाराजांनी करून त्यांना त्यांच्या योग्यतेनुसार कार्य सोपविले होते. जात आणि धर्म बाजुला सारून स्वराज्यातील महत्त्वाची पदे मुस्लिमांना दिली होती. इतकेच नव्हे तर घोडदळात मोठ्या प्रमाणात मुस्लिमांचा भरणा होता. तोफखानाप्रमुख, सरनोबत, आरमारातील मुख्य अधिकारी, अंगरक्षक, वकील अशा अनेक प्रमुख आणि महत्त्वाच्या पदावर मुस्लिम शिवकाळात कार्यरत होते. त्यांनी मुस्लिमांवर टाकलेला विश्वास हा त्यांचा निष्ठेचा एक भाग होता. स्वराज्य आणि स्वामीनिष्ठा मुस्लिम सैनिकांच्या मनात निर्माण करण्यात शिवाजी महाराज यशस्वी झाले होते. याच आधारावर स्वराज्याची निर्मिती करणे शक्य झाले.

**संदर्भ :-**

१) जोशी, शं.ना. (संपा.), ***कृष्णाजी अनंत सभासद विरचीत छत्रपती श्री शिवाजी राजे यांची बखर***, चित्रशाळा प्रकाशन, पुणे, १९६०, पृ. ३३.
२) शेजवलकर, त्र्यं.शं., ***श्री शिवछत्रपती***, मराठा मंदिर प्रकाशन, मुंबई, १९६४, पृ. ३१५.
३) केळकर, न.चि., आपटे, द.वि. (संपा.), ***शिवकालीन पत्रसार संग्रह***, खंड १, शिवचरित्र कार्यालय, पुणे, १९३०, पृ. १५७.
४) हनवते, प्रेम, ***शिवरायांचे निष्ठावंत मुस्लिम सैनिक***, सुधीर प्रकाशन, वर्धा, १९९४, पृ. ६०.
५) बेंद्रे, वा.सी., ***छत्रपती शिवाजी महाराज यांचे चिकित्सक चरित्र***, वा.सी. बेंद्रे, १९७२, पृ. ९२४.
६) हनवते, प्रेम, ***पूर्वोक्त***, पृ. ६१.
७) अमिन सैय्यद, ***महापुरूष शिवाजी महाराज***, पृ. १२३.
८) पानसरे, गोविंद, ***शिवाजी कोण होता?***, लोकवाङ्मय गृह, मुंबई, १९९८, पृ. २२.
९) अमिन सैय्यद, ***पूर्वोक्त***, पृ. १७४.
१०) जोशी, शं.ना. (संपा.), ***पूर्वोक्त***, पृ. ६१.
११) दिवेकर, स.म. (संपा.), ***कविन्द्र परमानंदकृत श्री शिवभारत***, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, शके १८४९, पृ. ७०,७१.
१२) दिवेकर, स.म. (संपा.), ***कवि परमानंद कृत अनुपुराण***, बडोदा ओरिएन्टल इन्स्टिट्यूट, बडोदा, १९५२, पृ. ७०-७३.
१३) अमिन सैय्यद, ***पूर्वोक्त***, पृ. ५४.
१४) कुळकर्णी, भीमराव (संपा.), ***कृष्णाजी अनंत सभासद विरचीत छत्रपती श्री शिवाजी महाराजांचे आद्यचरित्र***, अनमोल प्रकाशन, पुणे, १९८७, पृ. ६३,६८-७०.
१५) अमिन सैय्यद, ***पूर्वोक्त***, पृ. ६४.
१६) केळकर, न.चि., आपटे, द.वि. (संपा.), ***पूर्वोक्त***, पत्र क्र. १७४२.
१७) ***अठराव्या शतकातील मदारीच्या घराण्यातील हकीकत***, भारत इतिहास संशोधन मंडळ, वर्ष ४, अंक १०४, पृ. २७.
१८) पानसरे, गोविंद, ***पूर्वोक्त***, पृ. २३.
१९) पवार, डॉ. जयसिंगराव, ***मराठी सत्तेचा उदय***, सी. जमनादास आणि कं., १९८८, पृ. ३४४.
२०) अमिन सैय्यद, ***पूर्वोक्त***, पृ. १९३.